CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## विचारांच्या लेखणीतून सामाजिक समतेचा संदेश : विद्यार्थ्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.७ एप्रिल -**
शंकरराव पाटील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, भूम येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमांतर्गत निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा दि. ०८ एप्रिल २०२६ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि सामाजिक समता हा विषय देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये लेखन कौशल्य वाढविणे तसेच सामाजिक समतेबाबत जागरूकता निमर्गाण करणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी ५०० ते ८०० शब्दांमध्ये निबंध सादर करावा. निबंध मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत लिहिता येणार असून तो स्वमौलिक असणे आवश्यक आहे. उत्कृष्ट निबंधांना बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

महाविद्यालयातील सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. संतोष शिंदे यांनी केले आहे.



# घुगरी महाप्रसादाने येडेश्वरी देवी यात्रेची सांगता; भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग

**ग्राम पंचायततर्फे यात्रे सहकार्य करणाऱ्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांचा तसेच पाणी वाटप करणाऱ्या सेवाभावी नागरिकांचा सत्कार....**

**सुधीर लोमटे**
**येरमाळा, दि.७ एप्रिल -**
येथील आई येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेची सांगता मंगळवारी पारंपरिक घुगरी महाप्रसाद वाटपाने उत्साहात झाली.

गेले चार दिवस देवीची पालखी आमराई येथील पालखी मंदिरात मुक्कामी होती. पाचव्या दिवशी घुगरी महाप्रसादानंतर पालखीचे डोंगरावरील मुख्य मंदिराकडे प्रस्थान झाले.

सलग पाच दिवस चाललेल्या या यात्रेत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

चुना वेचण्याच्या परंपरेसाठी चुन्याच्या रानात पालखी आल्यानंतर पंधरा लाखांहून अधिक भाविकांनी उपस्थिती लावून पालखीवर चुनखडी अर्पण केली. त्यानंतर पालखी आमराई मंदिरात चार दिवस मुक्कामी होती, या काळात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यात्रेच्या शेवटच्या दिवशी भाविकांनी पालखी दर्शनासह घुगरी प्रसादासाठी मोठी गर्दी केली. गावातील घरोघरी रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा गोळा करून तयार केलेल्या घुगरी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. आमराई मंदिरात महापूजा व आरतीनंतर पुजारी, मानकरी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रसाद वाटप करून यात्रेची सांगता करण्यात आली.





यात्रेदरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेलही पाहायला मिळाली. आराधी गाण्यांच्या स्पर्धा तसेच शोभेच्या दारूची आतषबाजी यामुळे भाविकांचे मनोरंजन करण्यात आले.

> यात्रेतील पारंपरिक चुना वेचणे ही प्रथा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडली. भाविकांनी वेचलेली चुनखडी भट्टीत भाजून त्यातील चुना पुन्हा एकत्र केला जातो. पालखीबरोबर या चुन्याची पूजा करून तो मंदिरात नेला जातो. दुसऱ्या दिवशी पहाटे भाविक मंदिराला चुन्याने सारवतात. ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरू असून त्यासाठी भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात.

पालखी गावातील मुख्य रस्त्यांवरून जात असताना प्रत्येक घरासमोर महिलांनी सडा-रांगोळी काढून स्वागत केले.

फुलांची पायघड्या घालत पालखीचे भावनिक वातावरणात स्वागत करण्यात आले. पालखीच्या पाठवणीवेळी अनेक महिला भाविकांचे डोळे पाणावले होते, जणू नववधूच्या पाठवणीसारखे दृश्य निर्माण झाले होते.

गावकुसाबाहेर पालखी पोहोचल्यावर ग्रामपंचायतीतर्फे यात्रेत सहकार्य करणाऱ्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला.

पाणपोई, टँकर व पाणी वाटप करणाऱ्या सेवाभावी नागरिकांचाही गौरव करण्यात आला.

## पक्ष संघटना वाढीसाठी पूर्णवेळ काम करणार : अभिजीत चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ एप्रिल -**
महाराष्ट्र युवक काँग्रेसचे नूतन महासचिव अभिजीत चव्हाण यांनी आगामी काळात पक्ष संघटना वाढीसाठी पूर्णवेळ काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. काँग्रेस व सेवा दलाच्या वतीने त्यांच्या महासचिवपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.



धाराशिव जिल्ह्यातील युवक-युवतींच्या बेरोजगारीचा प्रश्न, लघुउद्योगांना भेडसावणाऱ्या अडचणी, शेतमजूरांचे प्रश्न, महावितरण, रस्ते, पाणी, आरोग्य व घरकुल या मूलभूत सुविधांबाबतच्या समस्यांवर येत्या काळात आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तुळजापूर तालुक्यातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन घेऊन काँग्रेसची ताकद वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी सेवा दल काँग्रेसचे प्रदेश सचिव शिवाजी गायकवाड, तानाजी जाधव, रसिक वाले, ॲड. रामचंद्र ढवळे, गोविंद डोंगरे, फरीद शेख, डॉ. सतीश महामुनी आदी उपस्थित होते.

## मंगल कार्यालयातून लॅपटॉप चोरी

**कळंब, दि.७ एप्रिल -**
शिराढोण येथील ओमसाई मंगल कार्यालयातून अज्ञात व्यक्तीने लॅपटॉप चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शिवकुमार प्रल्हाद केंद्रे (वय ३०, रा. दाभा, ता. कळंब) यांचा डेल कंपनीचा अंदाजे १५,००० रुपये किंमतीचा लॅपटॉप दि. २७ मार्च २०२६ रोजी दुपारी १.४५ वाजण्याच्या सुमारास ओमसाई मंगल कार्यालय, शिराढोण येथून अज्ञात व्यक्तीने चोरून नेला.

याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## अवकाळी पावसाने द्राक्ष बाग उद्ध्वस्त

**आ. तानाजीराव सावंतांकडून दीड लाखांची मदत**



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.७ एप्रिल -**
तालुक्यातील चिंचपूर ढगे येथील कष्टकरी शेतकरी अक्षय गोकुळ ढगे यांची द्राक्ष बाग दि. २ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व जोरदार वादळामुळे पूर्णपणे जमीनदोस्त झाली. या नैसर्गिक आपत्तीमुळे त्यांच्या बागेचे शंभर टक्के नुकसान झाले असून कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

मेहनतीने उभी केलेली बाग काही तासांत उद्ध्वस्त झाल्याने हतबल झालेल्या शेतकऱ्याला मदतीचा हात देत माजी मंत्री तथा आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांनी पुन्हा एकदा संवेदनशीलता दाखवली आहे.

भैरवनाथ उद्योग समूहाच्या माध्यमातून त्यांनी अक्षय ढगे यांना दीड लाख रुपयांचा धनादेश देऊन आर्थिक मदत केली. ही मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला दिलासा देणारा आधार ठरला आहे.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विशाल ढगे, जिल्हा परिषद सदस्य बालाजी काळे, पंचायत समिती सदस्य प्रशांत मुंडेकर, माजी सभापती निलेश शेळवणे, माणकेश्वरचे सरपंच विशाल अंधारे, अजित ढगे, ऋषी सुरवसे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्याची भेट घेऊन परिस्थितीची पाहणी करत धीर दिला.

> शेतकरी अडचणीत असताना केवळ बोलून उपयोग नसतो, तर त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे असते. आ.प्रा.डॉ. सावंत यांच्यासारखे लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत आहेत. संकटाच्या वेळी दिलासा देणारा हात आणि थोडीशी मदतही शेतकऱ्याला पुन्हा उभे राहण्याची ताकद देते.
>
> **- विशाल ढगे,**
> **संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, भूम**

दरम्यान, नुकसानीचा पंचनामा तातडीने करून शासकीय मदत लवकर मिळावी यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

## ‘माझा दवाखाना’त जनआरोग्य समितीची स्थापना; बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ एप्रिल -**
येथील बाळासाहेब ठाकरे माझा दवाखाना येथे जनआरोग्य समितीची स्थापना करण्यात आली असून रुग्णालयातील विविध समस्यांचे निवारण करण्याच्या उद्देशाने या समितीची पहिली बैठक दि.६ एप्रिल रोजी पार पडली.

समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक रीजवानउल्ला काझी यांची नियुक्ती करण्यात आली असून सदस्य म्हणून माजी नगरसेवक सुधीर हजारे यांच्यासह शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची निवड करण्यात आली आहे. बैठकीस समितीचे अध्यक्ष रीजवानउल्ला काझी, सय्यद कौसरपाशा जहागीरदार, साक्षी बनसोडे, शबाना कुरेशी, किशोर नळदुर्गकर उपस्थित होते. बैठकीत रुग्णांच्या समस्या, औषधांची उपलब्धता, स्वच्छता यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## येरमाळा यात्रेत भव्य कुस्ती स्पर्धा; अविनाश मोराळे ‘श्री येडेश्वरी केसरी’

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.७ एप्रिल -**
येथील श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सवाच्या चौथ्या दिवशी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने पारंपरिक पद्धतीने भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विविध भागांतून सुमारे १५० पैलवानांनी सहभाग घेत आखाडा रंगविला.

स्पर्धेचे उद्घाटन सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव, पोलिस उपनिरीक्षक स्वप्नील भोजगुडे, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेचे उपाध्यक्ष शिवाजी धुमाळ व विकास बारकुल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशासकीय उपसरपंच गणेश बारकुल, राहुल पाटील, सोमनाथ बारकुल, तानाजी सवने, दशरथ जाधव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेसाठी ग्रामपंचायतीकडून ७५ हजार रुपयांचा निधी देण्यात आला होता. विविध गटांमध्ये ५० ते ५ हजार रुपयांपर्यंतच्या इनामी कुस्त्या घेण्यात आल्या. स्पर्धेतील मुख्य आकर्षण ठरलेल्या २१ हजार रुपयांच्या मानाच्या कुस्तीचे आयोजन कै. किसन बारकुल यांच्या स्मरणार्थ करण्यात आले होते. तसेच श्री येडेश्वरी स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष सुरज चंद्रसेन बारकुल व वस्ताद संतोष जमदाडे यांच्या वतीने चांदीची गदा बक्षीस ठेवण्यात आली होती. या अंतिम कुस्तीत तेरखेडा येथील पैलवान अविनाश मोराळे व आंदूर (जि. सोलापूर) येथील राहुल मुळे यांच्यात रंगतदार लढत झाली. अखेर अविनाश मोराळे यांनी विजय मिळवत ‘श्री येडेश्वरी केसरी’ हा किताब पटकावला.



या स्पर्धेत कळंब, वाशी, धाराशिव तालुक्यांसह उस्मानाबाद, सोलापूर व बीड जिल्ह्यातील मल्लांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे महिला मल्लांचाही समावेश करण्यात आल्याने प्रेक्षकांचा उत्साह द्विगुणित झाला.

विजेत्या पैलवानांना धुमाळ वस्ताद यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. पंच म्हणून मिटू वस्ताद, जाधव वस्ताद, रकटे वस्ताद, विनोद पवार, शेळके वस्ताद, संतोष जमदाडे वस्ताद यांनी निःपक्षपातीपणे काम पाहिले.

या कुस्ती स्पर्धेला कुस्तीप्रेमी, ग्रामस्थ व भाविकांची मोठी उपस्थिती लाभली. यात्रेतील या पारंपरिक स्पर्धेमुळे नवोदित मल्लांना प्रेरणा मिळाली.

## सोने देण्याच्या आमिषाने महिलेची फसवणूक

**तुळजापूर, दि.७ एप्रिल -**
सोने देण्याचे आमिष दाखवत अनोळखी दोघांनी एका महिलेची फसवणूक करून तिच्या कानातील दागिने लंपास केल्याची घटना तुळजापूर येथे घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनिता रविंद्र तांबे (वय ५६, रा. कुंभारी, ता. तुळजापूर) या दि.६ एप्रिल रोजी पुजारी मंगल कार्यालयासमोरील फुटपाथवर होत्या. त्यावेळी दोन अनोळखी इसमांनी त्यांना १० ग्रॅम सोने देण्याचे आमिष दाखवले. या बहाण्याने आरोपींनी त्यांना सोनेरी रंग लावलेली लोखंडी पट्टी देत विश्वास संपादन केला आणि त्याबदल्यात फिर्यादींच्या कानातील सुमारे ४.८ ग्रॅम वजनाचे फुल-झुमके (अंदाजे किंमत २७,००० रुपये) घेऊन पसार झाले.


IN THE COURT OF THE MOTOR ACCIDENT CLAIM TRIBUNAL AT:
OMERGA, DIST. OSMANABAD (M.S.)
NOTICE FOR SETTLEMENT OF ISSUES
MACP M.A. No. 12/2024
Vasant/Malhari & Others
Exh. No. 24

**To,**
**Respondent No. 1. Malhari Dashrth Gayake**
**Age-36 Yrs, Occ. Driver R/o. Bhutkarwadi Ahmednagar, Tq. & Dist. Ahmednagar. Mo.No. 9356218738**
**Respondent No. 2. Sharad Vikram Sant**
**Age-44 Yrs, Occ. Business, R/o. Balikashram Raod, Jadhav Mala**
**Ahmednagar, Tq. & Dist. Ahmednagar**
**(Owner of Cruser Jeep No. MH-16 AJ 2729)**
**Mo. No. 9823068788**

Whereas hear above named Shri. Vasant Ram Dasime, Age- 31 Yrs, Occu. Private Service, R/o. Bhosaga, Tq. Lohara Dist. Dharashiv. has made an application for condonation of delay.

You are hereby summoned to appear before this tribunal in person of by pleader duly instructed on 09/06/2026 at 10.30 a. m. To answer the claim and filed written statement and produce document, failing which the claim will be heard and determined Ex-parte.

And also to take notice that in default of your filing address memo for service on or before the above date, you are liable to have defense struck of.

Date:- 07/04/2026

**sigh /-**
**Superintendent**
**Additional District Court,**
**Omerga, Dist. Osmanabad (M.S.)**


## असे वाटते या जन्मीची चक्कर वाया गेली; वडगाव (सि.) येथे रंगला गझल मुशायरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ एप्रिल -**
वडगाव (सि.) येथे अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती धाराशिव, अक्षरवेल आणि ब्रह्मा कुमारी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गझल मुशायरा अत्यंत उत्साहात आणि साहित्यिक वातावरणात पार पडला. कवयित्री बी.के. सुरभी यांच्या ‘मोरपिस’ व ‘अवघा रंग’ या पुस्तकांच्या प्रकाशनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




या मुशायऱ्याच्या अध्यक्षस्थानी धाराशिव येथील गझलकार सुनिता गुंजाळ कवडे या होत्या. यावेळी ज्येष्ठ गझलकार राजेंद्र अत्रे तसेच साहित्य भारती देवगिरी प्रांताचे मंत्री युवराज नळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात गझलकार मीना महामुनी यांच्या प्रभावी गझलेने झाली. त्यांच्या सादरीकरणाने सामाजिक वास्तवाचे दर्शन घडवित मुशायऱ्याला दमदार प्रारंभ मिळाला. त्यानंतर बीडचे बापू धनवे यांनी जीवनातील बदल आणि अनुभव मांडणारी गझल सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळवली. कृष्णा साळुंके यांनी हिंदी गझलेतून भावविश्व उभे केले, तर जीवन धेंडे यांच्या गझलेने वातावरणात एक वेगळीच रंगत निर्माण केली. गंगाखेडचे यशवंत मस्के यांनी विनोदी ढंगात सादर केलेल्या गझलेतून श्रोत्यांना हसवले, तर स्नेहलता झरकर अंदुरे यांनी जीवनातील वास्तव मांडत विचार करायला भाग पाडले.

नवनाथ खरात, डॉ. अविनाश कासांडे, ऋचा पत्की, डॉ. रेखा ढगे यांसह अनेक कवींनी विविध विषयांवरील गझला सादर करत मुशायऱ्याची उंची वाढवली. विशेषतः आईवरील गझल, सामाजिक संदेश देणाऱ्या रचना आणि हलक्या-फुलक्या विनोदी गझला यांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. युवराज नळे, आत्माराम जाधव, जना घुले, प्रा. विद्या देशमुख, बाळ पाटील, कांचनगंगा मोरे, डॉ. सुलभा देशमुख आणि वंदना केंद्रे-बांगर यांनीही आपल्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांची दाद मिळवली. कवयित्री बी.के. सुरभी यांनी सामाजिक आशय अधोरेखित करणारी गझल सादर केली, तर ज्येष्ठ गझलकार राजेंद्र अत्रे यांनी प्रेरणादायी गझलेतून सभागृहात उत्साह निर्माण केला. आत्तम गेंदे यांच्या आधुनिक संदर्भ असलेल्या गझलेने विशेष लक्ष वेधले. मुशायऱ्याचे सूत्रसंचालन गझलकार शेखर गिरी यांनी प्रभावीपणे केले. शेवटी अध्यक्ष सुनिता गुंजाळ कवडे यांनी आपल्या गझलेने कार्यक्रमाचा समारोप केला. बी.के. सुरभी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या गझल मुशायऱ्याला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


IN THE COURT OF THE MOTOR ACCIDENT CLAIM TRIBUNAL AT:
OMERGA, DIST. OSMANABAD (M.S.)
NOTICE FOR SETTLEMENT OF ISSUES
MACP M.A. No. 11/2024
Prathviraj / Malhari & Others
Exh. No. 24

**To,**
**Respondent No. 1. Malhari Dashrth Gayake**
**Age- 36 Yrs, Occ. Driver R/o. Bhutkarwadi Ahmednagar, Tq. & Dist. Ahmednagar. Mo. No. 9356218738**
**Respondent No. 2. Sharad Vikram Sant**
**Age- 44 Yrs, Occ. Business, R/o. Balikashram Raod, Jadhav Mala**
**Ahmednagar, Tq. & Dist. Ahmednagar**
**(Owner of Cruser Jeep No. MH-16 AJ 2729)**
**Mo. No. 9823068788**

Whereas hear above named Shri. Prathviraj Vivekanand Swami, Age-29 Yrs, Occu. Private Service, R/o. Indira Nagar, Lohara BK., Tq. Lohara Dist. Dharashiv. has made an application for condonation of delay.

You are hereby summoned to appear before this tribunal in person of by pleader duly instructed on 09/06/2026 at 10.30 a. m. To answer the claim and filed written statement and produce document, failing which the claim will be heard and determined Ex-parte.

And also to take notice that in default of your filing address memo for service on or before the above date, you are liable to have defense struck of.

Date:- 07/04/2026

**sigh /-**
**Superintendent**
**Additional District Court,**
**Omerga, Dist. Osmanabad (M.S.)**

